नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/१०/२०२४ (सोमवार)

---

## खुनाचा प्रयत्न करणा—या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा.

पोलीस स्टेशन भिवापुर:— दिनांक ११/०३/२०२१ रोजी फिर्यादी नामे रेखा अमित गांवडे वय ३४ वर्षे रा झिलबोडी ता भिवापुर जि नागपुर यांनी रिपोर्ट दिली की फिर्यादी आणि यातील आरोपी नामे सारंग काशीनाथ गावंडे आणि रंजीत काशीराम गावंडे दोघेही रा झिलबोडी ता. भिवापुर हे एकमेकांचे नातेवाईक असुन त्यांची घर शेजारी शेजारी आहेत. घरामध्ये पार्टेशन असुन इलेक्ट्रीकल मिटर एकच असल्याने नेहमी वाद होत होते.त्यावरून दिनांक ११/०३/२०२१ रोजी संध्या ०६:३० वाजता फिर्यादीचे पती अमित गांवडे आणि दोन्ही आरोपी यांच्या वाद होवुन दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीच्या पतीला काठीने डोक्यावर,हातावर,मांडीवर मारून जखमी त्यावरून पोस्टे भिवापुर येथे कलम ३०७,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.सदर गुन्हयाचा तपास सपोनि भस्मे यांनी करून आरोपीतांना अटक ,योग्य पुराव्यासह गुन्हयाचे दोषारोप पत्र मा न्यायालयात दाखल केले होते.

**सदर प्रकरणात मा. श्री एम.एस.कुलकर्णी साहेब, सत्र न्ययधीश,सत्र न्यायलय नागपुर यांनी एकुण ११ साक्षीदार तपासले. दोन्ही आरोपी नामे सारंग काशीनाथ गावंडे,वय ३० वर्षे आणि रंजीत काशीराम गावंडे ,वय ३५ वर्षे दोघेही रा झिलबोडी ता. भिवापुर यांना मा न्यायलयाने कलम ३२४ ,३४ भादवि मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी ५०० रूपये दंड,दंड न भरल्यास १ महीना सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. सरकार पक्षातर्फे श्रीमती वर्षा सायखेडकर मॅडम, ए.पी.पी यांनी केस चालवली.सदंर गुन्हयाचा तपास सहा.**

**पोलीस निरीक्षक शरद भस्मे यांनी करून दोषारोप पत्र दाखल केले.तसेच पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/तुलाराम खडसे नेम भिवापुर यांनी योग्य कामकाज केले.**

## पारशिवनी साकरला येथे अवैधरित्या दारू विकणा—या इसमावर धाड

## स्थानिक गुन्हे शाखेने केली कारवाई

पो.स्टे. पारशिवनी :—दिनांक १४/१०/२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्रात्प झाली की, पारशिवनी पोस्टे हददीत साकरला येथे अवैधरित्या दारू विक्री केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने साकरला येथे जावुन आरोपी नामे राजेश गेंदालाल दियेवर वय ५० वर्षे रा साकरला ता पारशिवनी यांच्यावर कारवाई केली असता आरोपीच्या ताब्यातुन ९० एमएल देशी दारूच्या ८० निपा किंमत २८०० रू असा मुददेमाल मिळुन आला. नमुद आरोंपी विरूध्द कलम ६५ ई म.दा.का अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहा.पोलीस निरीक्षक किशोर शेरकी,जीवन राजगुरू,पोहवा आशिष भुरे,पोहवा अमोल कुथे यांनी पार पाडली.

## खुनाचा प्रयत्न करणा—या आरोपीवर गुन्हा नोंद

## पोलीसांनी आरोपीला तात्काळ अटक केली.

पो.स्टे. कुही :—१३/१०/२४ चे १७/३० वा ते १८/०० वा मौजा खलासणा येथे यातील जखमी फिर्यादी शुभम लंकेश्वर कडु वय २६ वर्ष रा. खलासणा ता. कुही जि. नागपूर हा आपल्या मित्रांसोबत घटनास्थळी गावातील चौकात बसला असता आरोपी **नामे प्रज्वल प्रकाश गिरी वय २१ वर्ष रा. आजनी ता. कुही जि. नागपूर** हा देखील सोबत होता तेंव्हा तो

फिर्यादीसोबत मजाकबाजी करून तो निघुन गेला व त्यानंतर ०५ ते १० मिनीटांनी फिर्यादीच्या मागेहुन परत येवुन हातात एक धारदार चाकु सारखा शस्त्र हातात घेवुन आला व फिर्यादीच्या जिवे मारण्याच्या उद्देशाने मारले असता फिर्यादीने अटकाव करण्याचा प्रयत्न केला तेंव्हा दोन्ही हाताला कापल्याच्या जखमा झाल्या तेव्हा आरोपीने फिर्यादीला धक्का देवुन त्याच्या पाठीवर बसुन आरोपीने त्याच्या हातातील चाकुने फिर्यादीच्या मागील बाजुला मानेवर व पाठीवर डाव्या बाजुला कमरेजवळ मारून फिर्यादीला जखमी केल. तेंव्हा फिर्यादी स्वत:चा जिव वाचविण्याच्या उद्देशाने घटनास्थळावरून घरी पळुन गेले.

जखमी/फिर्यादी शुभम लंकेश्वर कडु वय २६ वर्ष रा. खलासणा ता. कुही जि. नागपूर यांच्या रिपोर्ट वरून नामे प्रज्वल प्रकाश गिरी वय २१ वर्ष रा. आजनी ता. कुही जि. नागपूर यांच्या विरूध्द कलम १०९ भा.न्या.संहीता—२०२३ गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**कुही पोलीसांनी तात्काळ आरोपीला १४/१०/२४ चे ०१/२० वाजता अटक केली असुन आरोपी पि.सी आर मध्ये आहे.सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील गोपाले मो.क्र ८०८०६७८५६२ हे करीत आहेत.**

## प्राणांतिक अपघात

पो.स्टे. कळमेश्वर :—दिनांक १२/१०/२४ चे १५/०० वा. ते १५/३० वा. दरम्यान कोहळी कळमेश्वर काटोल रोड येथे मृतक **नामे छोटेलाल बिंद वय ४२ वर्ष रा ग्राम खमरीया कला,ठाना—बिंदयाचल जिल्हा मिर्जापुर उ.प्र ह.मु.कोहळी कळमेश्वर** हें त्यांच्या पत्नी सह रावण दहणाचा कार्यक्रम बघायला जात असतांना मोसा. क्र एमएच—४०एएस—२९३३ ने जात असतांना कोहळी गावाजवळ कळमेश्वर काटोल रोडवर समोरून येणारी आयसर गाडी क्र एमएच— ४०—बीएल—२०३३ चे चालकने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन छोटेलाल बिंदु यांचे गाडीला धडक मारल्याने ते त्यांच्या पत्नी सह रोडवर पडुन गंभीर जखमी झाल्याने मृतक यांना चा मृत्यु झाला. तसेच मृतकाच्या पत्नीला नागपूर येथील राठी हॉस्पीटल येथे उपचाराकरिता ॲडमीट केले आहे.

फिर्यादी गौरवकुमार छोटेलाल बिंद वय १९ वर्ष रा. ग्राम खमरीया कला,ठाना—बिंदयाचल जिल्हा मिजापुर उ.प्र ह.मु.कोहळी कळमेश्वर यांच्या रिपोर्ट वरून आयसर गाडी क्र एमएच—४०—बीएल—२०३३ चा चालका विरूध्द कलम २८१, १०६(१), १२५(बी)बीएनएस १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर